एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या संगणक अर्हता परीक्षेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग (माहिती तंत्रज्ञान)**
**शासन निर्णय क्र. मातंसं १७१९/प्र.क्र.१८/से.५/३९**
**हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक - ३० जुलै, २०१९**

वाचा:- १) शासन अधिसूचना क्रमांकः सेप्रनि/१०९८/प्र.क्र.७/९८/१२, २५ जानेवारी, १९९९

२) शासन निर्णय क्र. प्रशिक्षण २०००/ प्र. क्र. ६१/२००१/३९, दिनांक १९ मार्च, २००३

३) शासन निर्णय क्रमांक: मातंस २०१२ /प्र. क्र. २७७/३९, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०१३

प्रस्तावना :-

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त उमेदवारांसाठी यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थांमार्फत एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) राबविण्यात येत आहे. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.टिआरएन-०५१७/प्र.क्र.३६/सीपीटीपी, दिनांक २१.०७.२०१७ अन्वये विहित करण्यात आलेल्या तरतुदींना अनुसरुन एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या उमेदवारांसाठी मुंबई विद्यापीठाशी संलग्न सत्र निहाय पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविण्यात येत आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सत्र-१ मधील PRACTICAL COMPONENT मध्ये संगणक विषयक अभ्यासक्रम हा भाग असून सदर विषयाबाबत प्रशिक्षणार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात येते. सबब पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना संगणक अर्हता परीक्षांमधून सूट देणेबाबतचा प्रस्ताव यशदा, पुणे या प्रशिक्षण संस्थेकडून प्राप्त झाला होता.

२. शासन मान्यता प्राप्त MS-CIT हा संगणक अभ्यासक्रम MKCL यांनी तयार केला आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामधील संगणक विषयक अभ्यासक्रम देखील शासनाच्या कामकाजास उपयुक्त ठरेल याप्रमाणे MKCL यांच्या सहाय्याने यशदा, पुणे आणि वनामती, नागपूर या प्रशिक्षण संस्थांनी तयार केला आहे.

३. एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामधील संगणक विषयक अभ्यासक्रम हा MS-CIT च्या अभ्यासक्रमाशी समकक्ष आहे. त्यामुळे सदर अभ्यासक्रम उत्तीर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांना संगणक अर्हता परीक्षा (MS-CIT किंवा तत्सम परीक्षा) उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याची बाब विचाराधीन होती त्याअनुषंगाने आता शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय:-**

राज्य शासनाच्या गट अ, ब आणि क मधील अधिकारी/कर्मचारी यांनी विहित मुदतीत संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अनिवार्य आहे. तथापि, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत राज्यसेवा परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारसप्राप्त उमेदवारांसाठी राबविण्यात येणाऱ्या एकत्रित परिविक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम (सीपीटीपी) अंतर्गत पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उत्तीर्ण झालेल्या अधिकाऱ्यांना संगणक अर्हता परीक्षा उत्तीर्ण असल्याचे समजण्यात येईल व अशा अधिकाऱ्यांना पुन्हा संगणक अर्हता परीक्षा प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता असणार नाही.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०७३०१७२३३१७८११ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Arjun Ashok Giraham

Digitally signed by Arjun Ashok Giraham
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=GAD-IT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=19fbebb38cd56675a5fc8e0bf0e55a13e7f4b028c5ccd8182ed48028223f03de, serialNumber=41524cd000bbc1d5d1ff212378815b6be4870fd0fcd2031260baa18314b15437, cn=Arjun Ashok Giraham
Date: 2019.07.30 17:29:52 +05'30'

**( अर्जुन अशोक गिऱ्हाम )**

**कार्यासन अधिकारी ,महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,
३. सर्व मा. मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,
५. पोलिस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, सेवा
७. अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/विशेष सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग
८. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई
९. *प्रबंधक, उच्च न्यायालय (मुळ शाखा),मुंबई,
१०. *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा),मुंबई,
११. *प्रबंधक, लोक आयुक्त/उप लोक आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
१२. *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१३. महालेखापाल १/२ लेखा व अनुज्ञेयता महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१४. महालेखापाल १/२ लेखा व परिक्षा महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१५. सर्व मंत्रालयीन विभाग,
१६. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
१७. सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य,

१८. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१९. *संचालक, यशदा, पुणे,
२०. *संचालक, वनामती, नागपूर,
२१. सर्व मुख्यकार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषदा,
२२. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
२३. सामान्य प्रशासन विभाग, कार्यासन सीपीटीपी,
२४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
निवड नस्ती (का-३९)